**BDC LIBRARY**
**News Paper Clipping**
**A.Y. 2025-26**

दैनिक
मुक्तागिरी

# देसाई कॉलेजमध्ये ऑलिम्पिक वीर खाशाबा जाधव यांचा जन्मदिन साजरा

मुक्तागिरी वृत्तसेवा

**पाटण, दि. १७ :** भारताचे पहिले वैयक्तिक ऑलिम्पिक पदक विजेते ऑलिम्पिक वीर खाशाबा जाधव यांचा जन्मदिन क्रीडादिन येथील बाळासाहेब देसाई कॉलेजमध्ये क्रीडाविभाग व आय. क्यू. ए. सी यांच्या सयुक्त विद्यमाने उत्साहात आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांनी खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेचे पूजन करून केले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. दीपक डांगे-पाटील उपस्थित होते.. अध्यक्षस्थानी महाविद्यालयचे प्रभारी प्राचार्य व्ही. ए. कळंत्रे होते. यावेळी आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. एच. व्ही. काटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. दीपक डांगे-पाटील म्हणाले की, ऑलिम्पिक वीर खाशाबा जाधव हे कठोर परिश्रम, चिकाटी, आणि आत्मविश्वाच्या बळावर सर्वाचो पदी पोहचले. प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी हेलिंस्की ऑलिम्पिकमध्ये कॉस्यपदक मिळवून देशाला गौरविले. आजच्या तरुण पिढीने त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त आणि देशाभिमानाची जोपासना करावी, खाशाबा जाधव यांनी देशाला ऑलिम्पिक पदक देऊन मान दिला. आता आपण त्यांच्या स्मरणाचा मान राखून, त्यांच्या आदर्शांना जपून, आपल्या जीवनात तंतोतंत उतरविणे हे आपले कर्तव्य आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने दररोज किमान एक तास शारीरिक क्रियाकलापांना द्यावा, आपल्या क्षमतेवर विश्वास ठेवावा आणि कोणत्याही परिस्थितीत हार न मानण्याची वृत्ती विकसित करावी. असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. कळंत्रे म्हणाले की, खाशाबा जाधव यांचे यश भारतीय क्रीडा इतिहासातील सुवर्णिम पान आहे. महाविद्यालयीन जीवनात अभ्यासाबरोबरच क्रीडा व इतर सांस्कृतिक कार्यक्रमांत सहभागी होणे गरजेचे आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल प्रा. अनिल पाटील यांनी खाशाबा जाधव यांच्या संघर्षमय जीवनप्रवासाचा आढावा घेत त्यांच्या अविश्वसनीय साधनसंपत्तीतून मिळवलेल्या ऐतिहासिक यशाचे महत्त्व सांगितले.

प्रा. एस. के. संकपाळ यांनी आभार मानले. कार्यक्रमास प्राध्यापक. विद्यार्थी, प्रशसकीय सेवक मोठ्या संखेने उपस्थित होते. या निमित्ताने महाविद्यालयात एक प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात विद्यार्थी प्रतिनिधी आणि क्रीडा विभाग यांचा सक्रिय सहभाग होता.